मुंबईत १०० हून अधिक ठिकाणी नाल्यांची उघडी झाकणे आढळली

■ मुंबई

आम आदमी पार्टीच्या सर्वेक्षणामध्ये मुंबई शहरात १०० हून अधिक ठिकाणी नाल्यांची उघडी झाकणे अर्थात उघडे मॅनहोल सापडले आहेत. अतिवृष्टी आणि पाणी साचल्यामुळे सदर उघडे मॅनहोल्स मुंबईकरांसाठी अत्यंत धोकादायक आहेत. दरवर्षी नागरिकांना या धोक्याचा सामना करावा लागतो ज्यामध्ये अनेकांना आपला जीवही गमवावा लागतो.

निष्काळजीपणा जीवघेणा सिद्ध झाल्यावरच बीएमसी कारवाई करणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे प्रशासन म्हणून उघड्या मॅनहोल्सासाठी बीएमसी जबाबदार असून पावसाळ्यापूर्वी सदरचे उघडे मॅनहोल्स लवकरात लवकर बंद करून मुंबईकरांचे प्राण वाचावे या दृष्टीने आपच्या कार्यकर्त्यांनी सोमवारी शहराच्या विविध ठिकाणी सर्वेक्षण केले.

आपकडून पोलखोल

सर्वेक्षणामध्ये आढळल्याप्रमाणे शहरातील नऊ प्रभागांमध्ये १०० हून अधिक ठिकाणी मोठ मोठे मॅनहोल्स बंदच केलेले नाहीत. पावसाळा अत्यंत जवळ येवून ठेपला तरीही अजूनपर्यंत मॅनहोल्स उघडे असल्याबाबत चिंता व्यक्त करत महापालिकेने आठवडाभरात सर्व उघडे मॅनहोल दुरुस्त करून झाकावेत आणि त्याची प्रत्यक्ष माहिती देण्यात यावी अशी मागणी आपने केली आहे. यावर्षी 'आप'ला ९ प्रशासकीय प्रभागांमध्ये पसरलेल्या शहरात १०९ उघडे मॅनहोल सापडले आहेत. यापैकी अनेक मॅनहोल्सच्या आजूबाजूला कोणतीही सूचना चिन्हे देखील नाहीत. ज्यामुळे पादचारी आणि वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. जर आप १०० हून अधिक उघड्या मॅनहोल्सचा मागोवा घेऊ शकत असेल तर महानगरपालिका आपल्या प्रचंड बजेट आणि साधनसामग्रीने ते का करू शकत नाही? असा सवालही आपने उपस्थित केला आहे.

१८ वर्षांपासून राज्यसभेच्या प्रतीक्षेत ट्वीटरवर फुटला नगमाचा संयम

■ मुंबई

काँग्रेसने राज्यसभा निवडणुकीसाठी उमेदवारांच्या नावांची घोषणा केल्यानंतर पक्षातील अंतर्गत धुसफूस समोर येऊ लागली आहे. राज्यसभेसाठी संधी न मिळाल्याने काँग्रेसमधील काही नेत्यांनी सोशल मीडियावर आपली नाराजी व्यक्त केली आहे. अभिनेत्री आणि काँग्रेस नेत्या नगमा मोराजी यांनी सोनिया गांधींनी १८ वर्षापूर्वी दिलेला शब्द पाळला नसल्याचा आरोप केला आहे.

काँग्रेसने महाराष्ट्रातून उत्तर प्रदेशमधील इम्रान प्रतापगढी यांना उमेदवारी जाहीर केली आहे. इम्रान प्रतापगढी हे काँग्रेसच्या

अल्पसंख्यांक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. महाराष्ट्रातून काँग्रेसला एकही योग्य उमेदवार मिळाला नाही का? असा प्रश्न उपस्थित होत असताना काँग्रेसमधील नाराजी समोर आली आहे. काँग्रेसने राजस्थानमधील तीन जागांसाठीदेखील दुसऱ्या राज्यातील उमेदवारांना संधी दिली आहे. राजस्थानमधून काँग्रेसने रणदीप सुरजेवाला,मुकुल वासनिक, प्रमोद तिवारी यांना संधी दिली आहे. तर, कर्नाटकातून जयराम रमेश, छत्तीसगडमधून राजीव शुक्ला, रणजीत रंजन, हरियाणातून अजय माकेन यांना उमेदवारी देण्यात आली आहे. काँग्रेसमध्ये राज्यसभेसाठी अनेकजण उत्सुक होते. काँग्रेसने आपले उमेदवार जाहीर केल्यानंतर अनेकांनी नाराजी व्यक्त केली.

दिल्लीचे आरोग्यमंत्री सत्येंद्र जैन यांना मनिलाँड्रींग प्रकरणी ईडीकडून अटक

■ नवी दिल्ली

आम आदमी पक्षाचे नेते आणि दिल्लीचे आरोग्यमंत्री सत्येंद्र जैन यांना मनिलॉंड्रिंग प्रकरणी ईडीने अटक केली आहे. जैन यांच्या अटकेमुळे केजरीवाल यांना मोठा धक्का बसला आहे.

सत्येंद्र जैन यांच्यावर कोलकाता येथील एका कंपनीशी हवालामार्फत आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे. बोगस कंपन्यांच्या माध्यमातून मिळालेल्या पैशातून दिल्ली आणि आसपासच्या परिसरात जमीन खरेदी केली होती. याप्रकरणाची चौकशी सुरू होती. याच चौकशीनंतर सत्येंद्र जैन यांना अटक करण्यात आली. दरम्यान जैन यांच्या अटकेबाबत बोलताना उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांनी सांगितले की, ८ वर्षापूर्वीची एक बोगस केस जैन यांच्यावर दाखल करण्यात आली होती.

याप्रकरणात त्यांना ईडीने अनेक वेळा चौकशीसाठी बोलावले होते. पण चौकशीतून काहीही मिळालेले नाही. म्हणून त्यांची चौकशी बंद करण्यात आली होती. पण आता अचानक ईडीने चौकशीच्या नावाखाली त्यांना ताब्यात घेतले आहे. जैन हे आज हिमाचल प्रदेशात जात असतानाच अचानक ईडीने त्यांचा ताबा घेतला. त्यांच्या अटकेबद्दल आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

मुकुल वासनिक यांनी नागपुरातून उमेदवारी घ्यावी! चव्हाणांची प्रतिक्रिया

■ मुंबई

काँग्रेसने राज्यसभेच्या जागेसाठी मुकुल वासनिकांच्या उमेदवारीवर प्रतिक्रिया देताना काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, जेव्हाही बाहेरच्या व्यक्तीला संधी दिली जाते तेव्हा नाराजी व्यक्त केली जाते. हाच प्रकार यावेळीही घडला आहे. मुकुल वासनिक यांना उमेदवारी जाहीर झाल्याने त्यांचे अभिनंदन करतो. मात्र, त्यांनी नागपुरातून उमेदवारी घ्यावी. कारण, त्यांचा संपर्क नागपूर आणि विदर्भात कायम राहील. बदल केला पाहिजे असे माझे मत आहे. मात्र, हा केंद्रीय पक्षश्रेष्ठींचा निर्णय आहे, असेही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

इमरान प्रतापगढी यांनी उत्तर प्रदेशातून तर मुकुल वासनिक यांनी नागपुरातून उमेदवारी अर्ज भरायला हवा. केंद्रीय पक्षश्रेष्ठींनी विचारपूर्वक ही उमेदवारी दिली असेल. महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसला डावलले जात आहे, हे खरं आहे. मात्र, आघाडीतून काँग्रेस बाहेर पडणार नाही. खातं कुणाकडेही असले तरी निधी समान दिला पाहिजे. मात्र, असं होताना दिसत नाही. यामुळेच नाराजी वाढत आहे. यावा वाचा फोडली पाहिजे, असेही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले. राज्यसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने दहा उमेदवारांची यादी रविवारी रात्री जाहीर केली. यात उत्तरप्रदेशातील नेते इम्रान प्रतापगढी यांना महाराष्ट्रातून संधी दिली आहे. महाराष्ट्रात नेहमीप्रमाणे काँग्रेसने बाहेरचा उमेदवार देण्याची परंपरा यावेळीही कायम राखली आहे. तर नागपूरचे मुकुल वासनिक यांना राजस्थानातून संधी दिली आहे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी पीक कर्जावरील व्याज परतावा देणे केंद्राने परत सुरु करावे

■ मुंबई

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची मागणी

केंद्र शासनाने बँकांना पीक कर्जापोटी देण्यात येणारा दोन टक्के व्याज परतावा थांबविण्याचा निर्णय घेताना कुठेही शेतकर्यांच्या हिताचा विचार केलेला नाही. त्यामुळे हा व्याज परतावा परत सुरु करून केंद्राने सर्वसामान्य शेतकरी आणि जिल्हा सहकारी बँका यांना दिलासा द्यावा असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणतात. व्याज परतावा बंद करण्याच्या केंद्राच्या अलीकडील निर्णयावर मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय कृषी मंत्री नरेंद्र सिंग तोमर यांना पत्र दिले असून हा परतावा पूर्ववत सुरु ठेवण्याची मागणीही केलेली आहे.व्याज परतावा बंद झाल्याने राज्यातील ७० लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांना फटका बसण्याची शक्यता आहे.

पुणे-मुंबई महामार्गावर अपघात! चौघांना चिरडले

■ पुणे

मुंबई महामार्गावर समीर लॉन्ससमोर सोमवारी पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास एका ट्रकने चार कामगारांना चिरडले. रस्त्यावर पांढऱ्या पट्ट्या मारण्याचे काम हे कामगार करत होते. यात एकाचा जागीच मृत्यू झाला असून, दोघे गंभीर जखमी आहेत. साजिद खान (वय २५, मु. रा. राजस्थान) असे मृत कामगाराचे नाव आहे. तर संदीप कुमार, प्रल्हाद यादव, भोला कुमार, अनिल कुमार अशी अपघातात जखमी झालेल्यांची नावे आहेत. मुंबई महामार्गावर रविवारी रात्रीपासून पांढरे पट्टे मारण्याचे काम सुरू होते. त्यामुळे रस्त्यावर कामगारांनी बॅरिकेट लावले होते. सोमवारी पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास पुण्याकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या एका भरधाव वेगातील ट्रकने रस्त्याचे काम करणाऱ्या कामगारांना चिरडले. एका कामगाराचा जागीच मृत्यू झाला तर ३ ते ४ कामगार जखमी झाले.

जाहीर सूचना

माझे अशील १) श्री. पूनाराम मनाराराम चौधरी आणि २) श्री. जोधाराम मनाराम चौधरी यांच्या सूचनेकरीता सूचना देण्यात येते की, ते, जर्क क्र. ९५७७६९५, फोटो पास सर्व क्र. ८७४७७ धारण केलेली बॅगेज क्र. ११, के-७, शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई ४०००८८, नवीन फोटो पास क्र. ००००००८७२७७ हे दुकान /संरचना, या पश्चात सदर "जागा" असे उल्लेखित, १. श्री. सुरेश केवल कोठावळे, दिनेश श्री. केवल शिवाराम कोठावळे, २. श्रीमती जयिता अजय बेर्डे, दिनेश श्री. केवल शिवाराम कोठावळे यांची कन्या, ३. श्री. पद्मकुमार श्रीधर कोठावळे, दिनेश श्री. केवल शिवाराम कोठावळे यांचा नातू, आणि ४. श्री. प्रशांत श्रीधर कोठावळे यांचा नातू, सर्व दिनेश श्री. केवल शिवाराम कोठावळे यांचे केवळ ऑरिस कार्पोरेटर कारस आहेत, यांनाच्या ऑर्डरी कडून इंजिनिअर, दिनेश श्री. केवल शिवाराम कोठावळे हे त्यांच्या हयातीमध्ये सदर जागेचे एकमेव मालक होते. माझ्या अशिलांची सदर नमूद केले आहे की, सदर दिनेश श्री. केवल शिवाराम कोठावळे यांचा श्री. श्रीधर केवल कोठावळे नावाचा अनुज एक मुलगा आहे आणि ते दि. १४.०५.२००५ रोजीपासून हरवला आहे आणि त्याचा हरवलेली तक्रार त्याचा मुलगा श्री. प्रद्युम्ना श्रीधर कोठावळे यांनी दि. १२.०७.२००५ रोजी शिवाजी नगर पोलीस स्टाफकडे येथे तक्रार क्र. ८८/०५ अन्वये दिलेली आहे.

सदर जर्नलमध्ये कोणताही मालकहिस्का, वारसाहक्क, वारसा, हक्क, समभाग, शीर्षक, हितसंबंध, स्वकब्जा किंवा कोणताही हक्क, इ. या मार्गे कोणतेही दावा असल्यास सर्व व्यक्ती/प्राधिकाऱ्यांनी त्याबाबत मला कागदपत्री पुराव्यांचा नोटरीकृत प्रमाणित सत्य प्रतिसह लेखी स्वरूपात माझ्या निम्न उल्लेखित वकीलाच्या सदर जाहीर सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत सूचित करणे आवश्यक आहे, असे न केल्यास, कोणती व्यक्ती/प्राधिकाऱ्यांचे कोणतेही दावे माहीत असे मानले जाईल आणि माझे अशील ती जागा खरेदी करण्यास मुक्त असतील. जाणापासून सदर १५ दिवसांच्या वरकामाकरीता जर कोणतेही दावे प्राप्त झाल्यास, ते सोडून दिले, गुंडाळून ठेवले, माफ केले असे समजण्यात येईल.

सही/-
अभिषेक के. पारेख
वकील उच्च न्यायालय
दुकान क्र. १५ आणि १६, जकात मार्केट, वेस्ट रेल्वे स्टेशनकडून, मेहुर, मुंबई ४०० ०७१

मुंबईत ३ ठिकाणी पाणीकपात

■ मुंबई

मुंबई महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून मुंबईत ३ ठिकाणी पाणीकपात करण्यात आली आहे. ही पाणीकपात ३ जून ते ९ जून दरम्यान करण्यात येणार आहे. पाणीपुरवठा विभागाकडून ही माहिती देण्यात आली आहे. पाणीपुरवठा विभागाकडून ही पाणीकपात करण्यात येणार